# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

**४था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईट, मुंबई ४०० ०२१**
**दूरध्वनी : ०२२-२२०२६५४९, २२८३५२४७,२२०२५३५४**
ई-मेल : ms.mjp2022@gmail.com, sehqmjp21@gmail.com


## *** परिपत्रक क्र. २६८ ***

**विषय :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये मान्यताप्राप्त पुरवठादार म्हणून होत असलेली नोंदणी (Vendor Enlistment) रद्द करणेबाबत.

**संदर्भ :**
१) मजीप्राचे परिपत्रक क्र.१५९, दि. ०८.०६.२०१५.
२) मजीप्राचे परिपत्रक क्र.१७३, दि. ०६.०१.२०१६.
३) मजीप्राचे परिपत्रक क्र.२२४, दि. ०१.०३.२०१९.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये स्थापत्य, विद्युत व यांत्रिकी साहित्याकरिता पूर्वीपासून Vendor Enlistment (मान्यताप्राप्त पुरवठादार नोंदणी) प्रक्रिया कार्यान्वित होती. सदर प्रक्रिया पूर्वी अनेक साहित्यांना BIS मानांकन नसणे तसेच तांत्रिक तपशिलांची (Technical Specification) स्पष्टता नसणे या कारणास्तव लागू करण्यात आलेली होती.

तथापि, सध्यस्थितीत कामांच्या निविदा Model DTP नुसार करण्यात येत असून त्यामध्ये साहित्याकरिता आवश्यक Technical Specifications / Technical Analysis स्पष्टपणे नमूद करण्यात येत आहे. तसेच सद्यस्थितीत बहुतांश साहित्यांना BIS मानांकन उपलब्ध असल्याने साहित्य खरेदीमध्ये गुणवत्ता सुनिश्चित करण्याकरिता स्वतंत्र Vendor Enlistment आवश्यक राहिलेली नाही.

Vendor Enlistment प्रक्रिया कायम ठेवल्याने साहित्य खरेदीमध्ये स्पर्धा मर्यादित राहून दर वाढण्याची शक्यता निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच काही साहित्याकरिता अत्यल्प Vendor Enlistment झाल्याने स्पर्धा कमी प्रमाणात होत आहे. यामुळे शासनाच्या Ease of Doing Business धोरणास अनुरूप अशी खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया राबविण्यात अडथळे निर्माण होत आहेत.

तसेच मजीप्राकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या Schedule of Rate (SOR) मध्ये साहित्याकरिता आवश्यक मानके नमूद असल्याने स्वतंत्र Vendor Enlistment ची आवश्यकता भासत नाही.

वरील सर्व बाबींचा विचार करता स्पर्धा वाढविणे, दर कमी करणे, पारदर्शकता वाढविणे, कामांची अंमलबजावणी जलद करणे तसेच दुहेरी तपासणी टाळणे या उद्देशाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील Vendor Enlistment प्रक्रिया रद्द करणे उचित ठरत असल्याने खालील निर्णय घेण्यात येत आहेत.

**१) Vendor Enlistment प्रक्रिया रद्द**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये स्थापत्य, विद्युत व यांत्रिकी साहित्याकरिता अस्तित्वात असलेली मान्यताप्राप्त पुरवठादार नोंदणी (Vendor Enlistment) प्रक्रिया यापुढे या परिपत्रकाच्या दिनांकापासुन रद्द करण्यात येत आहे.

**२) चालु निविदांकरिता Vendor Enlistment अट लागू राहणार नाही**

यापुढे Vendor नोंदणीची अट रद्द होणार असल्याने ज्या चालु निविदांमध्ये साहित्य खरेदी ही "महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मान्यताप्राप्त पुरवठादाराकडून (Vendor Enlistment) घ्यावी" अशी अट नमूद आहे, तथापि आता Vendor नोंदणीची अट रद्द केल्याने अशा सर्व ठिकाणी मजीप्रामार्फत असलेली Vendor Enlistment ची अट लागू राहणार नाही.

सदर निविदांमधील साहित्य हे निविदेमध्ये नमूद केलेल्या Technical Specifications / BIS मानके यानुसार इतर पात्र उत्पादक/पुरवठादारांकडून घेण्यास मुभा राहील.

**कृपया मागे पाहा...**

### ३) पुढील निविदांमध्ये Vendor Enlistment अट समाविष्ट करू नये

यापुढील कोणत्याही निविदेमध्ये साहित्य खरेदीसाठी "महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील अधिकृत पुरवठादार नोंदणी (Vendor Enlistment) आवश्यक" अशी अट समाविष्ट करण्यात येऊ नये.

### ४) निविदेमध्ये तांत्रिक Specification नमूद करणे बंधनकारक

तथापि, साहित्य खरेदीसाठी गुणवत्ता व मानके सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने संबंधित निविदेमध्ये साहित्याचे Technical Specifications / BIS मानके / आवश्यक तांत्रिक अटी स्पष्टपणे नमूद करण्यात याव्यात.

### ५) गुणवत्ता तपासणी व जबाबदारी

BIS मानांकन नसलेल्या साहित्याकरिता निविदेमध्ये नमूद केलेल्या Technical Specifications नुसार गुणवत्ता तपासून साहित्य क्षेत्रीय कार्यालयाकडून स्विकारण्यात यावे. साहित्याच्या गुणवत्तेबाबतची जबाबदारी निविदा अटींनुसार संबंधित पुरवठादार/उत्पादकावर राहील.

### ६) अंमलबजावणी

हे परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून तत्काळ अंमलात येईल व सर्व संबंधित कार्यालयांनी सदर निर्देशांचे काटेकोर पालन करावे.

Vendor Registration संदर्भातील हा निर्णय पूर्वलक्षी (Retrospective) स्वरूपात लागू राहील. तसेच सध्या चालू असलेल्या निविदांमध्ये नमूद तांत्रिक अटी व BIS मानके पूर्ण करणाऱ्या सर्व पात्र उत्पादक / पुरवठादारांकडून साहित्य खरेदी करण्यास हरकत राहणार नाही.

### ७) पूर्वीच्या परिपत्रकांना रद्द / Supersede करण्याबाबत

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये मान्यताप्राप्त पुरवठादार म्हणून होत असलेली नोंदणी (Vendor Enlistment) करीता यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले सर्व परिपत्रके, सूचना हे या परिपत्रकाद्वारे अतिक्रमित करण्यात येत असून, ते यापुढे लागू राहणार नाहीत.

(अमगोथु श्री रंगा नायक, भाप्रसे)
**सदस्य सचिव**

**जा.क्र./मजीप्रा/अअ(मु.)/सामान्य-३४/(२०२५)/** ६६      **दि.** ०१.०४.२०२६

**प्रत :** मा.सदस्य सचिव यांचे स्विय्य सहाय्यक, म.जी.प्रा, मुंबई यांना माहितीकरीता सविनय सादर.

**प्रत : माहिती व आवश्यकत्या कार्यवाहीसाठी:**

- सहसचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना
  आपल्या आखत्यारित असलेल्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना महानगरपालिका, नगरपरिषद इ. आपले स्तरावरुन सदर परिपत्रक वितरित करुन अवगत करावे.
- संचालक (वित्त), म.जी.प्रा., नवी मुंबई.
- मुख्य अभियंता म.जी.प्रा. (सर्व)
  आपल्या आखत्यारित असलेल्या सर्व क्षेत्रीय कार्यालयाने सदर परिपत्रक वितरित करुन अवगत करावे.
- मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. (सर्व) ..............................
- अधीक्षक अभियंता म.जी.प्रा. गु.प.प., नवी मुंबई.
- अधीक्षक अभियंता सी.पी.डी.एम., नवी मुंबई.
- अधीक्षक अभियंता म.जी.प्रा. (सर्व) ..................................
- कार्यकारी अभियंता म.जी.प्रा. (सर्व) ..................................
- उप अभियंता म.जी.प्रा. आय.टी.सेल, नवी मुंबई.

प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर विक्रेता या सदराखाली सदरचे परिपत्रक उपलब्ध करणेबाबत योग्यती कार्यवाही करावी.